# राशिभविष्य - नोव्हेंबर, २०१७ .

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत सध्या हर्शल ग्रह असल्यामुळे या राशीच्या मंडळींचा स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी झाला असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा धाक वा दडपण असह्य होत असावे, असेही वाटते. या राशीची लहान मुले तर अतिशय वांड, हूड, व्रात्य अशी झाली असणेही संभवते. तसे असेल तर प्रयत्नपूर्वक मनावर संयम व सहनशीलतेचे संस्कार घडविणे आवश्यक होईल. कारण हा हर्षल शास्त्रीय संशोधनात रस असणारांना अनुकुल व उपयुक्त असा होणार आहे. असा स्वभाव व त्यात भर म्हणून लाभस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे कुमार्गी मित्रांशी संपर्क झाल्यास अविचाराने खर्च करणे, आर्थिक घोटाळे निर्माण होणे अशापैकी समस्या त्रस्त करतील. त्यामुळे काहींना गहरे नैराश्य येणेही संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. तर दशम स्थानी असलेला केतू नोकरी-व्यवसायात मनस्ताप देणाऱ्या घटना घडविण्याची शक्यता दिसते. काहींना तर हातचे सोडून नवीन काही तरी करण्याची उर्मी येईल. पण त्यांनी तसे करू नये. आहे ती नोकारीच मनापासून करावी, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. महिन्याच्या पूर्वार्धात शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकाराचा एखादा आजार होणे संभवते. तसेच काहींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यताही दिसते. त्याचप्रमाणे आर्थिक नुकसान होणे, अपघातामुळे हाडमोड होणे अशापैकी घटना घडणेही शक्य आहे जपा. परंतु या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला मंगळ ग्रह वैद्यकीय संशोधन कार्यात उपयुक्त होईल व यांत्रिक तांत्रिक व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या सप्तम स्थानी असलेला रवि ग्रह नोकरी-व्यवसायास अनुकुल होईल; पण महिन्याच्या उत्तरार्धात मनस्तापदायक असल्याचाच अनुभव येईल. काहींना कुमार्गी मित्रांच्या संगतीमुळे नको ते करण्याची उर्मी येईल. जपा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे युवक युवतींचे विवाह ठरतील व संपन्न होतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या मंडळीना विविध प्रकारचे लाभ होतील. कार्यसिद्धी होईल. पण रविमुळे अनारोग्याचा त्रास सहन करणेही अशक्य होईल. शनीमुळे दूरदूरचे प्रवास होणे शक्य दिसते. काहींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. श्रद्धेने श्रीगणेश व श्रीहनुमान यांची उपासना करा. श्रीहनुमानचालीसा स्तोत्राचे दररोज नियमितपणे पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या तृतीय स्थानी असलेला राहू हरहुन्नरी व कर्तृत्ववान असला तरी बंधुसुखास बाधक असणारा आहे. पंचम स्थानी असलेला मंगळ संतति सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. मुलांपैकी कोणाचे आजार, कोणाचे गैर आचरण अशापैकी घटना घडल्यास मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. पण वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्यांना तो अनुकुल होईल. शासकीय , निम-शासकीय नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण शुक्रामुळे आळस, जडत्व येऊन काही करू नये अशी भावना होणे संभवते. जपा. बुधामुळे वैवाहिक जीवनात मतभेद, भांडणे निर्माण होणे संभवते. जपा. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हाच बुध अनुकुल व सुखकारक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला शनि ग्रह आरोग्यविघातक असला तरी गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे आरोग्य फारसे बिघडणार नाही. पण काही मंडळींना एखाद्या मोठ्या आजाराला तोंड द्यावे लागण्याची शक्यता मात्र आहे. जपा.

भाग्यस्थानी असलेल्या केतूमुळे वाद ,भांडणे होऊन कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. दशम स्थानी असलेला नेपच्यून मानसिक आजार तज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना अनुकुल व लाभदायक होईल. पण इतरांच्या व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होणे संभवते. व्यय स्थानी असलेला हर्शल अत्यंत प्रतिकुल असून तो शत्रुत्व निर्माण करील, काहींना सांपत्तिक अडचणींना तोंड द्यावे लागेल, तर काहींना नको त्या प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. जपा. तसे घडू नये म्हणून सतत सावधानतेने आचरण करा. चैनी वृत्तीला आळा घाला, सुस्त राहू नका. मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून आचरण करा. दररोज नियमितपणे कुलदैवताची उपासना करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखासाठी प्रतिकुल ठरण्याची शक्यताच अधिक दिसते. तसेच नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा पूर्वार्ध मनस्ताप देणारा असाच सिद्ध होईल. शिवाय काही जणांना आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागेल. जपा. अशा प्रतिकुल काळात मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून, मौन व्रत धारण करून, नम्रतेचे आचरण करून व सहनशील बनून काळ व्यतीत करणेच सुखाचे होईल. त्यामुळे होणारा मनस्ताप सुसह्य होईल व मनोनुकुल घडणाऱ्या काही घटनांचा आनंद उपभोगू शकाल. काही जणांना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; तर काहींना स्थावर संबंधी समस्या मनस्ताप देईल असे वाटते. जीवनसाथीची आरोग्यविषयक समस्या त्रस्त करील. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणास होणारा अन्य प्रकारचा त्रास, प्रिय जनापासून होणारे दूरत्व अशापैकी घटना घडणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. अशा प्रतिकुल परिस्थितीत गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या नोकरदार मंडळींच्या नोकरीत सुखकारक घटना घडतील, हितशत्रू पराभूत होतील. काहींना वाममार्ग धन सहज मिळत असल्याने ते स्वीकारण्याचा मोह होईल; पण असा मोह कटाक्षाने टाळाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. मित्रांशी वाद, भांडणे टाळा. ज्यांना अध्यात्मात मनापासून रस आहे त्यांना इष्ट देवतेच्या उपसनेद्वारे किंवा शिवोपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना सूचक स्वप्ने पडतील तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात मन:शक्ती प्राप्त होईल. त्यामुळे मन धीट, महत्त्वाकांक्षी बनेल. हिम्मत वाढेल. हातून कर्तबगारीची एखादी घटना घडेल . काहींना प्रवासाचे योग येतील. पण सतत सावधानतेने आचरण करा. कारण बेसावध अवस्थेत एखादी दुखापत होणे संभवते. जपा. काहींच्या मनात अपमानाचा सूड घेणारी भावना निर्माण होणे संभवते. जपा. शेती व्यवसाय असणारांना या महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. काहींना ऐषाराम मिळेल. मित्रसुख मिळेल. कौटुंबिक सुख समाधान लाभेल. स्थावर खरेदीविक्रीची इच्छा असणारांची मनोकामना पूर्ण होईल. पण काही नातेवाईक मंडळीकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता जाणवते. नोकरी-व्यवसायात मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे, त्यामुळे नैराश्य येणे अशापैकी घटना घडणे संभवते. त्यामुळे शारीरिक अनारोग्य निर्माण होणेही संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात काही

मनोनुकुल घटना घडतील. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या काहींना मनासारखे काहीच घडत नसल्याची जाणीव होऊन नैराश्य येईल. काहींना अकारण जडत्व येणे संभवते. लोखंडी सामान, कोळसा विक्रेते, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व आर्थिक लाभ देणारा असा असल्याचा अनुभव येईल. पण मनस्थिती काही कारणाने अस्वस्थच राहील. जपा. जलप्रवास करू नका, पाण्यापासून दूर राहा, कारण जलभय संभवते. तसेच विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. कर्क राशी गुरु ग्रहाची उच्च राशी असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करावी व दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे " पठण करावे.

**(५) सिंह -** नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या राशीच्या मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. पण त्यासाठी सर्वांगीण आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. कारण धनस्थानी असलेला मंगळ आर्थिक चिंता निर्माण कारीलसे दिसते. वाढता खर्च, आर्थिक नुकसान, अनपेक्षित पूर्ण कराव्या लागणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या, येणे वसूल होण्याची शक्यता कमी अशा कात्रीत पकडणाऱ्या घटना घडणे संभवते. जपा. त्यामुळे मनस्ताप होऊन उष्णता विकार बळावतील. त्यामुळे काहींना नेत्रविकाराचा तर काहींना घसा, दाढा, मान दुखण्याचा आजार होणे संभवते. जपा. मंगळामुळे मन महत्त्वाकांक्षी बनेल. धैर्य, हिम्मत वाढेल. हातून कर्तृत्वपूर्ण घटना घडेल व त्यामुळे आत्मविश्वास वाढेल. काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. पण सतत सावधानतेने आचरण करा. नपेक्षा दुखापत, अपघात होणे संभवते. जपा. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. नोकरदार मंडळींपैकी काहींना मानाचे स्थान तर काहींना प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. काहींना भूमिलाभ होणेही संभवते. महिन्याचा उत्तरार्ध कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करणारा व अनारोग्यकारक असणे संभवते. पण बुध-शुक्राच्या अनुकुलतेमुळे परिस्थिती आटोक्यात राहील. संततिसुखाचे दृष्टीने काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. कारण मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाची आचरणविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणांनी बाधा येणे संभवते.. जपा. भाग्यस्थानी असलेल्या हर्शलमुळे शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना त्यांच्या संशोधन कार्यात प्रगती करणे शक्य होईल. तसेच काहींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. पण राहू-नेपच्यून दाम्पत्य जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची दाट शक्यता आहे. जपा. कुलदैवताची उपासना मन:शांती देईल.

**(६) कन्या -** सध्या या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अत्यंत अहंकारी, हट्टी, मानापमान फार असलेला, हेकट, उद्धट असा घडला असावा असे वाटते. तसे असेल तर शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. तसेच या राशीच्या काहींना उगीचच आपणास एखादा भयंकर आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. तसेच काल्पनिक चिंता त्रस्त करतील. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत मनस्ताप देणाऱ्या घटनांना तोंड द्यावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने प्रतिकुल परिस्थिती सुसह्य होईल व मनोनुकुल घटना घडून कौटुंबिक सुख लाभेल. अनारोग्याचा फारसा त्रास होणार नाही. धनस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे

बौद्धिक कार्यक्षेत्र व साहित्यिक लेखन व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व धनलाभ देणारा असल्याचा अनुभव येईल. काहींना भूमिलाभ, काहींना धनलाभ तर काहींना मानाचे स्थान वा प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. पण हितशत्रूंपासून सावध राहा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल व सुखकारक जाईल. वरिष्ठ अधिकारी कामाची प्रशंसा करतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे अपेक्षित गृहसौख्य मिळणे अशक्य होईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात गृहसौख्य व मित्रसुख लाभेल. केतुमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येणे संभवते. तसेच या केतुमुळे अध्यात्म, धर्म, गूढ विद्या, वेदांत, उपासना यांची आवड असणारांना प्रगती करणे शक्य होईल. अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. राहूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अधिकारी मंडळींना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह कटाक्षाने टाळा. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या अतिशय भावनाशील झाली असावी असे वाटते. तसे असेल तर या महिन्याच्या काळात जे संमिश्र प्रकारचे अनुभव प्राप्त होणे संभवते, ते सहन होण्यासाठी त्यांनी आध्यात्मिक उपासनेत काळ व्यतीत केल्यास काळाची प्रतिकुलता सहन करण्यास मन:शक्ती प्राप्त होईल. रवि-मंगळ हे दोन्ही प्रभावी ग्रह प्रतिकुल असल्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्यविघातक होतील, असे वाटते. नियोजित कार्यात अडथळे, अडचणी येणे, प्रगतीत बाधा येणे, मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे, अविचाराने खर्च होणे, आर्थिक चिंता निर्माण होणे, काही मंडळींना जुन्या दबलेल्या प्रकरणाचा पुन्हा त्रास होणे, व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडून मनस्ताप सहन करावा लागणे, आर्थिक फसवणूक होणे, गैरसमजामुळे वाद, भांडणे होणे, अशापैकी कारणानी शारीरिक उष्णता भडकून अनारोग्य होणे संभवते. रवि-मंगळ दोन्ही अहंकारी स्वभावाचे ग्रह असल्याने अकारण श्रम, दगदग होणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना तर घरीदारी सतत मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. पण मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवू शकलात, सहनशील होऊ शकलात व सतत नम्रतेचे आचरण करू शकलात तरच अनारोग्याचा फारसा त्रास होणार नाही. शिवाय गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून ज्या मनोनुकुल घटना घडतील त्यांचे सुखसमाधान अनुभवू शकाल. गुरु ग्रह बौद्धिक व संशोधनात्मक कार्यात कार्यमग्न असणारांना प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच आरोग्यदायकही होईल. शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळू शकेल. मात्र बुध ग्रह धनप्राप्तीस अनुकुल असला तरी हितशत्रूंचा त्रास सहन करावयास लावील. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे या राशीच्या युवकयुवतींना उत्तम नोकरी वा नवे आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल; पण हाच शनि ग्रह भावंडविषयक एखादी चिंता सहन करावयास लावील. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व त्यामुळे विपरीत काळ फारसा मनस्ताप न होता व्यतीत करू शकाल.

**(८) वृश्चिक -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे व या राशीच्या मंडळींचा मूळ स्वभाव तापट, अहंकारी, कमीपणा न घेणारा असा असल्यामुळे त्यांनी प्रयत्नपूर्वक सतत मनावर संयम ठेवून, सहनशील बनून , नम्रतेचे आचरण करून व शक्यतो मौन व्रत धारण करून विपरीत काळ व्यतीत केला तरच होणारा असह्य मनस्ताप सुसह्य होईल व शुभ ग्रहांच्या काही

प्रमाणातील अनुकुलतेमुळे घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आनंद ते अनुभवू शकतील. रक्तदाब व हृदयविकार असणाऱ्या या राशीच्या मंडळींनी तर विशेष जपले पाहिजे. रवि ग्रह व राशिस्वामी मंगळ खूप कष्ट-परिश्रम केल्यानंतरच अर्थप्राप्ती देऊ शकतील. पण हाच मंगळ काही मंडळीना मौल्यवान वस्तूंची भेट देऊ शकेल; तर काही मंडळींच्या बाबतीत मित्रांशी वितुष्ट येऊ शकणाऱ्या घटना घडविण्याची दाट शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या अखेरच्या दोन दिवसांत तर हा मंगळ असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडवील, असे वाटते. रवि ग्रह प्रतिकुल असल्याने नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होतील; असे वाटते. त्यामुळे काहींना गहरे नैराश्य येणे संभवते. मन सतत अस्वस्थ राहील. काही मंडळींना थकल्यासारखे वाटेल. गुरु ग्रह अध्यात्म व सामाजिक कार्य- क्षेत्र असणारांना अनुकुल होणार असला तरी राहू, शनी प्रमाणे तो कौटुंबिक सुखात बाधाच निर्माण करण्याची दाट शक्यता जाणवते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला हर्शल शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण याच हर्शलमुळे काहींना डोकेदुखीचा तर काहींना मेंदू विकाराचा आजार त्रस्त करीलसे दिसते. म्हणून अकारण सतत अति खोलवर विचार करू नका. गैरसमज, वाद, भांडणे अशापैकी घटनांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळणे कठीण होईल. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** शनि ग्रहाची साडेसाती असून याच राशीत शनि ग्रह असल्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटनांशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता वाटते. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे, कुटुंबातील प्रिय व्यक्तींचे स्थलांतरामुळे दूरत्व सहन करावे लागणे, शिवाय स्वत:च्या व जीवनसाथीच्या आरोग्यविषयक समस्यांमुळे या राशीच्या काहींना गहरे नैराश्य येणे संभवते. मनस्थिती स्थिर राहू शकली नाही तर या राशीच्या काही जणांना महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात कुसंगतीची बाधा त्रस्त करीलसे दिसते. जपा. या राशीच्या धनस्थानी असलेला केतू आर्थिक चिंता निर्माण कारीलसे दिसते. जपा. अध्यात्मिक उपासनेसाठी काळ अनुकुल असल्याने गुरु ग्रहाच्या उपासनेद्वारे नैराश्य कमी होईल व मन स्थिर राहू शकेल. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होणार असल्याने त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. या राशीच्या अधिकारी मंडळींना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह टाळावाच. तेच सुखाचे होईल. महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल असण्याची शक्यताच अधिक दिसते. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. खाजगी नोकरीत असणारांना कामाचा ताण सहन करावा लागेलसे दिसते. काही युवावस्थेतील युवकयुवतींना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तो मोह टाळावाच. यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, औषध विक्रेते, वैद्यकीय व्यवसाय असणारांना काही प्रमाणात काळ अनुकुल व लाभदायक होईल. अशा प्रतिकुल काळातही गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील, धनलाभ होईल, विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल, विवाहेच्छूंना विवाहयोग येईल, काहींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योगही येतील. सुखसमाधान लाभेल. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दरोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व सुखकारक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना तर इच्छा -आकांक्षा पूर्ण करणारा असा सिद्ध होईल. मोठ्या मंडळींच्या ओळखी होतील. काहींना बढती, मानाचे स्थान असे काही मिळू शकेल.
असे असले तरी मंगळामुळे या राशीच्या युवकांना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. काही मंडळीना कामाचा ताण सहन करावा लागेल. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने बौद्धिक कार्यक्षेत्र व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना त्यांच्या कार्यात अडथळे, अडचणी येत असल्याचा अनुभव येईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात परिस्थितीत सुधारणा होईल. काहींना नवे मित्र मिळतील, धनलाभ होईल व सुखसमाधान लाभेल. असे असले तरी काही मंडळींना आर्थिक समस्यांची चिंता त्रस्त करीलसे दिसते. काहींना आर्थिक जबाबदाऱ्या कशा पार पाडावयाच्या याची चिंता त्रस्त करील. जपा. त्यामुळे आहे त्यात सुखसमाधान लाभणार नाही. सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुख समाधान मिळणे अशक्य होईल. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे अनारोग्य, मानहानी, मनस्ताप देणाऱ्या घटना त्रस्त करतील. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्याने सतत मनावर संयम ठेवून व सहनशीलतेने आचरण करा. तेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे "हनुमानचालिसा " स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या अतिशय कोमल झाली असून मानसिक संवेदना अति शीघ्र होत असतील, असे वाटते. तसेच स्वभावही लहरी होणे संभवते त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. अति विचार करू नका. मनस्थिती सतत शांत ठेवा. तरच आरोग्य उत्तम राहू शकेल, व अनुकुल काळाचा लाभ घेऊ शकाल. नपेक्षा शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकार बळावतील. तसेच अति तिखट पदार्थांचे सेवन टाळाच. नपेक्षा मूळव्याधीसारखे आजार त्रस्त करतील. जपा. जिद्दीला पेटून अकारण कष्ट, परिश्रम होणे संभवते. जपा. वीज, पाणी यापासून जपा. अपघात योग संभवतो. महिन्याच्या अखेरच्या दिवसांत शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मनस्ताप होणे संभवते. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना या महिन्याचा काळ अधिक अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होणे संभवते. या राशीच्या ज्या मंडळींचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना या संबंधामुळे अधिक धनलाभ होणें संभवते. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. भाग्यस्थानी असलेल्या गुरु=शुक्र या शुभ ग्रहांमुळे काही मंडळीना गुरुकृपा तर काहींना सुसंगती, काहींना कीर्ती-प्रसिद्धी असे काही मिळणे संभवते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या काही व्यावसायिकांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे येण्याची शक्यताही दिसते. बुध ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. काहींना नवे मित्र मिळतील. काहींना धनलाभ होणेही शक्य दिसते. पण लाभस्थानी असलेल्या

शनि ग्रहामुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना करा.

**(१२) मीन -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींची बुद्धी अस्थिर , चंचल होणे संभवते. त्यामुळे अविचाराने आचरण होणे संभवते. वाचा स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे अविचाराचे आचरण होणे संभवते. जिभेला लगाम घाला; नपेक्षा आपल्या फटकळ बोलण्याने समोरचा माणूस अकारण दुखावला जाईल व त्याच्याशी तुमचे संबंध तुटतील. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे दलाली, कमिशन वर व्यवसाय करत असणारांना काळ लाभदायक होईल. पण हाच राहू विविध कारणांनी संततिसुखात बाधा निर्माण करीलसे दिसते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने जीवनसाथीचे किंवा स्वत:चे अनारोग्य, वाद, भांडणे , गैरसमज अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी तर संशयाने किंवा अन्य कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तर काहीजण तर भावनेच्या भरात कुठेही भरकटत जाणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांपैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. शुक्राच्या अनुकुलतेने काहींना धनलाभ , काहींना भूमिलाभ तर काहींना मान, प्रतिष्ठा असे काही मिळू शकेल. मात्र या राशीच्या नोकरदार मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल व मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. लोखंड, कोळसा व्यापार असणारांना तसेच वकिली , सल्लागारी व्यवसाय असणारांना, तसेच गुप्त पोलीस खात्यातील नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====